**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/ CR.९२/DisM-१ दि.१७/०४/२०२०
५) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.०२/०५/२०२० व ०३/०५/२०२०.
६) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.२३/२० दि.०३/०५/२०२०.
७) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१७/०५/२०२०.
८) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.२४/२० दि.१७/०५/२०२०.
९) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१९/०५/२०२०.

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/सुधारीत मार्गदर्शकसूचना/आदेश/कावि-११९२/२० दि.२१/०५/२०२०

जिल्हाधिकारी पालघर

**सुधारीत आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक असल्याने उपोद्घातातील अ.क्र.८ अन्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत निर्गमित करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, सदरहू आदेशान्वये उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये दिनांक ०३/०५/२०२० रोजीच्या आदेशातील तसेच उपोद्घातातील अ.क्र.८ च्या आदेशातील नमूद नियमावली व उपाययोजना लागू रहातील असे आदेशित केले आहे. तद्नंतर शासनाने उपोद्घातातील अ.क्र.९ अन्वये सुधारीत मार्गदर्शकसूचना निर्गमित केलेल्या असून त्याची अंमलबजावणी करणेकामी निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **शासनाच्या दिनांक १९/०५/२०२० रोजीच्या मार्गदर्शकसूचनेनुसार पालघर जिल्हयामध्ये खालील नमूद बाबींकरीता दिनांक २२/०५/२०२० रोजी पासून लागू करीत आहे.**

१) शासनाचे दिनांक १७/०५/२०२० रोजीच्या आदेशानुसार टाळेबंदीचा कालावधी (लॉकडाऊन) दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत अंमलात राहील.
२) सदरचा आदेश दिनांक २२/०५/२०२० पासून अंमलात येईल व दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत लागू राहील.

३) यापूर्वीचे टाळेबंदीबाबतचा दिनांक ०२/०५/२०२० रोजीचा आदेश अधिक्रमित करुन सदरचा आदेश (परिशिष्टांसह) लागू राहील.

४) **मनाई आदेशा दरम्यान पालघर जिल्हयात दिनांक ३१ मे २०२० पर्यंत प्रतिबंधीत असलेल्या बाबी :**

i) डोमॅस्टीक वैद्यकीय सेवा, डोमॅस्टीक एअर ॲम्बुलन्स, सुरक्षा विषयक बाबी आणि गृहमंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळून इतर सर्व राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक बंद राहील.

ii) पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी शाळा, जिल्हा परीषद शाळा, अनुदानित/विनाअनुदानीत, सर्व आश्रमशाळा, निवासी आश्रमशाळा, महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था व कोचिंग क्लासेस बंद राहतील. तथापि ऑनलाईन/ दुरूस्थ शिक्षणाला परवानगी राहील.

iii) हॉटेल, रेस्टॉरंट व इतर आदरातिथ्य सेवा बंद राहतील. मात्र आरोग्य/पोलीस/शासकीय अधिकारी/ आरोग्य विषयक कर्मचारी, लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या व्यक्ती जसे की, पर्यटक आणि अलगीकरणासाठी आवश्यक असणारी आदरातिथ्य सेवा तसेच बस स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन येथील कॅटींग सुरु राहतील व रेस्टॉरंटमधील स्वयंपाकगृह अन्न पदार्थाची घरपोच सेवा पुरविणेकरीता चालू राहतील.

iv) सर्व सिनेमा गृहे, मॉल्स, शॉपिंग कॉम्पलेक्स, व्यायाम शाळा, क्रिडा संकूल, जलतरण तलाव, मनोरंजन केंद्रे, प्रेक्षागृहे, बार, सभागृहे, मंगल कार्यालये आणि एकत्रित जमण्याची ठिकाणी आणि तत्सम इतर ठिकाणे.

v) सर्व सामाजिक/ राजकीय/ क्रिडा विषयक/ मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम/ इतर संमेलने आणि मोठया प्रमाणात एकत्र येणे (Large Congregations).

vi) सर्व धार्मिक स्थळे तसेच इतर सर्व प्रार्थना स्थळे भाविकांना दर्शनासाठी बंद राहतील. सर्व धार्मिक सभा/परिषदा बंद राहतील.

५) नागरिकांच्या हालचाली या परिशिष्ट-१ मध्ये नमूद कार्यप्रणालीनुसार सुरु राहतील.

६) कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनासाठी परिशिष्ट-२ मध्ये नमूद राष्ट्रीय मार्गदर्शक तत्वांचे संपूर्ण पालघर जिल्हयात पालन करणे बंधनकारक राहील.

७) **रात्रीची संचारबंदी :**

अत्यावश्यक बाबी वगळता **संध्याकाळी ७.०० ते सकाळी ७.०० वाजेपर्यंत** नागरीकांची हालचाल पुर्णपणे बंद राहील. सदर बाबीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.८ मधील दिनांक १७/०५/२०२० रोजीच्या आदेशान्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत लागू करण्यात आला आहे.

८) **अतिजोखमीच्या व्यक्तींचे संरक्षण :**

६५ वर्षावरील जेष्ठ नागरीक, यापूर्वी इतर आजार असलेल्या व्यक्ती, गरोदर महिला, १० वर्षाच्या खालील बालके, वैद्यकीय बाबी व अत्यावश्यक व वैद्यकीय सेवा वगळता राष्ट्रीय निर्देशकानुसार घरी राहतील यांची दक्षता घ्यावी.

**९) Red Zone and Non Red Zones (Orange & Green Zones) :**

i) जिल्हयातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्र **"Red Zone"** मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

ii) उर्वरीत पालघर जिल्हयाच्या क्षेत्राचा नॉन रेड झोनस (**ऑरेंज व ग्रीन झोन**) मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

**१०) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) :**

i) सार्वजनिक आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने निश्चित केलेल्या मागदर्शक तत्वानूसार Red Zone व Non Red Zone मध्ये महानगरपालिका/ जिल्हा प्राधिकाऱ्यांकडून प्रतिबंधित क्षेत्र निर्धारीत करण्यात येईल.

ii) महानगरपालिका क्षेत्रामध्ये महापालिका आयुक्त व जिल्हयाच्या उर्वरीत क्षेत्रामध्ये जिल्हाधिकारी यांना प्रतिबंधित क्षेत्र निश्चित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सदरचे क्षेत्र हे उपलब्ध साधनसामुग्रीचा विचार करुन परिणामकारकरित्या व कार्यक्षमपणे व्यवस्थापन होणारे असावे. प्रतिबंधित क्षेत्र हे रहिवाशी कॉलनी, मोहल्ला, झोपडपट्टी, इमारत, इमारतींचा समुह, गल्ली, वॉर्ड, पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र, खेडेगांव, खेडेगांवाचा लहान समुह असेल यापेक्षा मोठे प्रतिबंधित क्षेत्र (उदा. संपूर्ण तालुका/संपूर्ण महानगरपालिका) मा.मुख्य सचिव यांच्या मान्यतेने जाहीर करता येईल.

iii) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये फक्त अत्यावश्यक बाबी अनुज्ञेय राहतील. या क्षेत्रामध्ये वैद्यकीय आवश्यकता व अत्यावश्यक बाबींचा पुरवठा या व्यतिरिक्त लोकांनी ये-जा करण्याबाबत कडक निर्बंध राहतील.

**११) रेड झोन (Red Zone) मध्ये खालील नमूद बाबींना परवानगी असेल :**

i) यापुर्वीच्या आदेशाने अनुज्ञेय व परवानगी दिलेली अत्यावश्यक सेवेतील सर्व दुकाने यापुढेही सुरु राहतील.

ii) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये यापुर्वी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व सवलतीनुसार अत्यावश्यक सेवेशिवाय असलेली इतर दुकाने ही महानगरपालिकेच्या धोरणानुसार सुरु राहतील.

iii) मद्य विक्रीची दुकाने यापुर्वीच्या आदेशाप्रमाणे सूरु राहतील व घरपोहोच सेवाही सूरु राहील.

iv) रेड झोनमध्ये दुकाने/मॉल्स/आस्थापना/उद्योग यांना सूरु करण्यास परवानगी राहणार नाही. मात्र सदरहू आस्थापनांचे देखभाल व दुरुस्तीसाठी तसेच मान्सुनपुर्व कामे करण्यासाठी सदरहू आस्थापना **सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत** सूरु राहतील. तथापी याठिकाणी कोणताही व्यवसाय व उत्पादन करण्यास मनाई राहील.

v) अत्यावश्यक व अत्यावश्यक सेवेशिवाय असलेल्या इतर सेवा यासाठी दिली जाणारी ई-कॉमर्स सेवा चालु राहतील.

vi) यापुर्वीच्या आदेशान्वये अनुज्ञेय असलेले उद्योग सुरु राहतील.

vii) यापुर्वीच्या आदेशान्वये अनुज्ञेय केलेली सर्व प्रकारची बांधकामे (**सार्वजनिक किंवा खाजगी**) सुरु राहतील. तसेच सर्व प्रकारची मान्सुनपुर्व कामे (सार्वजनिक किंवा खाजगी) सुरु राहतील.

viii) **नागरिकांची वाहतूक खालील प्रमाणे सूरु राहील :**

a) टॅक्सी, कॅब, रिक्षा यातून प्रवास करण्यास मनाई राहील.

b) अत्यावश्यक कामकाजासाठी चार चाकी वाहनातून वाहन चालकाव्यतिरिक्त जास्तीत जास्त दोन प्रवाशांना परवानगी राहील.

c) अत्यावश्यक कामकाजासाठी दुचाकी वाहनावर एकाच व्यक्तीस परवानगी राहील.

ix) अत्यावश्यक सेवा जसे आरोग्य व औषध, कोषागार, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस, एन.आय.सी., अन्न व नागरी पुरवठा, भारतीय अन्न महामंडळ, एन.वाय.के., महानगरपालिका, नगरपरीषद व नगरपंचायत यामधील कर्मचारी आवश्यकतेनुसार कार्यरत राहतील.

x) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सरकारी कार्यालये (दुय्यम निबंधक कार्यालये, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, महाविद्यालयातील शिक्षणोत्तर कामकाजासाठी, (Non Teaching purposes) उत्तरपत्रिका तपासणीसाठी व निकाल जाहीर करणेसाठी लागणारे कर्मचारी ५% किंवा कमीत कमी १० कर्मचारी यापेक्षा अधिक नाही एवढे कर्मचारी उपस्थितीत सुरु राहतील.

xi) केंद्र शासनाची कार्यालये सद्यस्थिती अनुज्ञेय असलेल्या प्रमाणानुसार सुरु राहतील.

xii) रेस्टॉरंट / किचन मधून घरपोच सेवा सुरु राहील.

xiii) यापुर्वीच्या आदेशात नमुद ज्या बाबींना परवानगी दिलेली आहे त्या यापुढेही सुरु राहतील. तथापि सर्व खाजगी कार्यालये बंद राहतील.

१२) **आरोग्य सेतू ॲपचा वापर करणे : (Aarogya Setu)**

i) आरोग्य सेतू ॲप संसर्ग होण्यापासून तात्काळ कळविते. त्यामुळे सदरचे ॲप व्यक्ती व समाजासाठी कवच म्हणून काम करते.

ii) प्रत्येक कार्यालये व कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या अनुषंगाने सर्व कर्मचारी यांनी त्यांच्या मोबाईलवर आरोग्य सेतू ॲप इन्स्टॉल करणे बंधनकारक राहील.

iii) जिल्हयातील प्रत्येक नागरिकांनी त्यांच्या मोबाईलवर आरोग्य सेतू ॲप इन्स्टॉल करुन त्यामध्ये आपल्या आरोग्यविषयक माहिती अद्ययावत करावी.

१३) **व्यक्तींची व मालाची वाहतूक करणेसाठी सर्वसाधारण सूचना :**

i) राज्यातील व राज्या बाहेरील वैद्यकीय सेवेशी निगडीत, डॉक्टर, परिचारीका, पॅरा मेडीकल कर्मचारी, सफाई कर्मचारी यांच्या वाहनांची व ॲम्ब्युलन्सची वाहतूक कोणत्याही निर्बंधाशिवाय सुरु राहील.

ii) सर्व प्रकारच्या मालाची आंतरराज्य वाहतूक मोकळया ट्रकसह (goods/cargo, including empty trucks) सुरु राहील.

१४) **Non Red Zones :**

या आदेशाच्या उपरोक्त परिच्छेद क्रमांक ४ मध्ये नमूद नसलेल्या बाबी व ज्यावर स्पष्टपणे प्रतिबंध किंवा बंदी घातलेल्या नाही अशा सर्व बाबी नॉन रेड झोन (Non Red Zone) मध्ये खालील अटींवर सुरु राहतील.

i) अनुज्ञेय असलेल्या बांबीकरिता कोणत्याही सरकारी प्राधिकऱ्यांची परवानगी घेण्याची गरज नाही.

ii) स्पोर्टस कॉम्पलेक्सेस/ खेळाचे मैदान/ इतर खुली मैदाने वैयक्तिक व्यायाम करणेकरीता

खुले राहतील. परंतु या ठिकाणी सामुहिक उपक्रमांना व प्रेक्षकांना परवानगी असणार नाही. तसेच सर्व प्रकारचे शारीरिक व्यायाम व इतर बाबी या सामाजिक अंतर (Social Distancing) राखुन करणे बंधनकारक राहील.

iii) सर्व सार्वजनिक व खाजगी वाहतूकीकरिता प्रवासी व्यवस्थापन खालील प्रमाणे राहील.

a) दु चाकी वाहनांवर एकाच व्यक्तीस परवानगी राहील.

b) तीन चाकी वाहनांकरिता वाहन चालक व दोन प्रवासी अशी परवानगी राहील.

c) चार चाकी वाहनांकरिता वाहन चालक व दोन प्रवासी अशी परवानगी राहील.

iv) Non Red Zone मध्ये जिल्हा अंतर्गत बस सेवा ५०% क्षमतेवर सुरु राहील. शारिरीक अंतर (Physical Distancing) व स्वच्छतेबाबतचे नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

v) आंतर जिल्हा बस सेवेबाबत शासनामार्फत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित केले जातील.

vi) सर्व बाजारपेठा व दुकाने सकाळी ९.०० वाजेपासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. **तथापि या ठिकाणी गर्दी केल्यास किंवा सामाजिक अंतर (Social Distancing) पालन न केल्याचे आढळून आल्यास संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून सदरहू बाजारपेठा व दुकाने तात्काळ बंद करण्यात येतील.**

१५) **सर्वसाधारण सूचना :**

i) या आदेशात काहीही नमूद असले तरी प्रतिबंधित क्षेत्राकरीता (Containment Zone) यापूर्वी जाहीर केलेली आरोग्य विषयक नियमावली लागू राहील.

ii) या आदेशासोबत परिशिष्ट ३ सर्वांच्या सोयीकरिता जोडले असून ते मुळ आदेशासोबत अवश्य वाचावे.

iii) उपोद्घातातील अ.क्र.१ मध्ये नमूद केलेल्या बाबींपैकी एखादी बाब सदर आदेशामध्ये नमूद नसल्यास शासनाच्या मुळ आदेशातील तरतुदी लागू राहतील.

कोणत्याही व्यक्तीने सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ ते ६० मधील तरतुदीनुसार व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक २१/०५/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

६) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

७) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

९) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१०) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

११) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) गट विकास अधिकारी पंचायत समिती वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.

१३) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर/जव्हार/डहाणू यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१४) मुख्याधिकारी, नगरपालिका मोखाडा/विक्रमगड/वाडा/तलासरी यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१५) पालघर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय/महामंडळे/खाजगी आस्थापना यांना.

जिल्हादंडाधिकारी पालघर

## परिशिष्ट-१

**महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२, आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डिआयएसएम-१ दि.१९/०५/२०२०.**

### केंद्र शासनाचे गृह मंत्रालयाकडून जाहीर केलेली आदर्श कार्य पध्दती (SOP)

१) भारतातील परदेशी नागरीकांचे वाहतूक व्यवस्थेबाबत पारीत केलेले दि.०२/०४/२०२० चे आदेशाने प्रसिध्द केलेली कार्यप्रणाली.

२) राज्यांमध्ये /केंद्रशासीत प्रदेशात अडकलेल्या मजूरांचे हालचालीकरीता पारीत केलेले दि.१९/०४/२०२० चे आदेशाने प्रसिध्द केलेली कार्यप्रणाली.

३) समुद्रातुन ये-जा करणाऱ्या भारतीय मच्छिमार / खलाशी यांचे बाबतीत पारीत केलेले दि.२१/०४/२०२० चे आदेशाने प्रसिध्द केलेली कार्यप्रणाली.

४) लॉकडाऊनमुळे अडकलेले मजूर, यात्रेकरु, पर्यटक, प्रवासी, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांचे वाहतूकीबाबत पारीत केलेले दि.२९/०४/२०२० व दि.१/५/२०२० चे आदेशाने प्रसिध्द केलेली कार्यप्रणाली.

५) परदेशात अडकलेले भारतीय आणि इतर महत्त्वाच्या व्यक्ती यांचे वाहतूकीबाबत पारीत केलेले दि.०५/०५/२०२० चे आदेशाने प्रसिध्द केलेली कार्यप्रणाली.

६) रेल्वेमधून व्यक्तींच्या वाहतूक करणेकामी पारीत केलेले दि.११/०५/२०२० व दि.१९/०५/२०२० चे आदेशाने प्रसिध्द केलेली कार्यप्रणाली.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

# परिशिष्ट-२

## महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२, आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डिआयएसएम-१ दि.१९/०५/२०२०.

## कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय मार्गदर्शक तत्वे

१. सर्व सार्वजनिक व कामाच्या ठिकाणी Face Cover वापरणे बंधनकारक आहे.
२. सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायदा/विनियम/नियमानुसार दंड आकारण्यात यावा.
३. सार्वजनिक ठिकाणी व वाहतूकीच्या दरम्यान सामाजिक अंतर (Social Distaning) पाळणे सर्वांसाठी बंधनकारक आहे.
४. विवाह सारख्या सार्वजनिक कार्यक्रमात सामाजिक अंतर (Social Distaning) पालन करणे बंधनकारक आहे. मात्र ५० पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास परवानगी असणार नाही.
५. अंत्यविधी सारख्या प्रसंगी सामाजिक अंतर (Social Distaning) पालन करणे बंधनकारक आहे. मात्र ५० पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास परवानगी असणार नाही.
६. सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, मद्य इत्यादी यांचे सेवन करण्यास मनाई राहील.
७. सर्व दुकानदारांनी ग्राहकांमध्ये एकमेकांपासून ६ फुटांचे अंतर पाळले जाईल यांची खात्री करावी आणि दुकानात एकाच वेळी ५ पेक्षा अधिक व्यक्ती येणार नाहीत याची खात्री करावी.

**कामाच्या ठिकाणांकरिता अतिरिक्त मार्गदर्शकतत्वे :**

८. शक्य असल्यास कर्मचारी यांना घरुन काम करण्यास परवानगी दयावी.
९. कार्यालये/कामाची ठिकाणे/बाजारपेठ/व्यवसाय/दुकाने/औद्योगिक व व्यावसायिक आस्थापना या ठिकाणी कामाचे किंवा व्यवसायाचे तास पाळले जावेत.
१०. सर्व प्रवेश व निर्गम स्थानावर थर्मल स्कॅनिंग, सॅनिटाइझर व हात धुण्याची सुविधा उपलब्ध करावी. या शिवाय कामाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात सॅनिटायझर, हँड वॉश उपलब्ध करून देण्यात यावे.
११. सर्व कामाची ठिकाणे, सार्वजनिक सुविधांचे आणि मानवी संपर्कात येणारी सर्व ठिकाणे जसे की, दरवाजाचे हँडल इत्यादीचे Shifts दरम्यान तसेच वारंवार निर्जतुकींकरण करावे. तसेच दोन पाळयांदरम्यानही निर्जतुकींकरण करावे.
१२. दोन पाळयांमध्ये सुयोग्य अंतर ठेवून तसेच भोजन अवकाश योग्य वेळेचा ठेवून व इतर मार्गाचा वापर करून कामाच्या ठिकाणी योग्य सामाजिक अंतर (Social Distaning) पाळणे जाईल याची संबंधित सर्व व्यवस्थापकांना बंधनकारक राहील.

(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

# परिशिष्ट-३

**महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२, आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डिआयएसएम-१ दि.१९/०५/२०२०.**

## कोव्हीड १९ साठी लॉकडाऊन ४.०

## महाराष्ट्राच्या कार्यक्षेत्रात परवानगी असलेल्या व नसलेल्या बाबी

| अ.क्र. | बाब | रेड झोन | उर्वरीत क्षेत्र | प्रतिबंधित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | रेल्वे, विमान, मेट्रो प्रवास | नाही | नाही | नाही |
| २ | आंतरराज्य रस्ता वाहतूक | नाही | नाही | नाही |
| ३ | शैक्षणिक संस्था | नाही | नाही | नाही |
| ४ | आदरातिथ्य हॉटेलस | नाही | नाही | नाही |
| ५ | शॉपिंग मॉल | नाही | नाही | नाही |
| ६ | धार्मिक स्थळे आणि मोठया प्रमाणात एकत्र येणे. | नाही | नाही | नाही |
| ७ | मद्य विक्रीची दुकाने | होय घरपोहोच सेवा | होय | नाही |
| ८ | ६५ वर्षावरील व्यक्ती व गरोदर महिला व १० वर्षाखालील मुले यांना बाहेर जाण्यास सवलत | नाही | नाही | नाही |
| ९ | औषधालय व ओ.पी.डी. | होय | होय | नाही |
| १० | टॅक्सी, कॅब, रिक्षा | नाही | १+२ | नाही |
| ११ | चारचाकी वाहने | अत्यावश्यक | १+२ | नाही |
| १२ | दुचाकी वाहने | अत्यावश्यक | १ | नाही |
| १३ | आंतरजिल्हा एसटी प्रवास सेवा | नाही | नाही | नाही |
| १४ | जिल्हांतर्गत एसटी प्रवास सेवा | नाही | होय | नाही |
| १५ | मालाची वाहतूक | होय | होय | होय |
| १६ | उद्योग (शहरी) | अत्यावश्यक | होय | नाही |
| १७ | उद्योग (ग्रामीण) | लागू नाही | होय | नाही |
| १८ | शहरी भागात बांधकामाच्या ठिकाणी मजूर असलेली बांधकामे | होय | होय | नाही. |
| १९ | इतर खाजगी बांधकाम ठिकाणे | नाही | होय | नाही |
| २० | शहरी भागातील स्वतंत्र दुकाने | मर्यादित | होय | नाही |
| २१ | अत्यावश्यक मालाची दुकाने | होय | होय | होय |
| २२ | ई-कॉमर्स अत्यावश्यक वस्तू | होय | होय | नाही |
| २३ | ई-कॉमर्स अत्यावश्यक वस्तू वगळून इतर वस्तू | होय | होय | नाही |
| २४ | खाजगी कार्यालये | नाही | होय | नाही |
| २५ | सरकारी कार्यालये | ५% किंवा कमीत कमी १० कर्मचारी | होय १००% | नाही |
| २६ | शेती आस्थापना | नाही | होय | नाही |
| २७ | बँक आणि वित्तीय आस्थापना | होय | होय | नाही |
| २८ | कुरीयर आणि पोस्ट सेवा | होय | होय | नाही |
| २९ | वैद्यकीय आपत्कालीन सेवा | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | केस कर्तनालय, स्पा, सलून | नाही | होय | नाही |
| ३१ | प्रेक्षकांविना स्टेडीयम | नाही | होय | नाही |
| ३२ | उपहारगृहातून घरपोहोच सेवा | होय | होय | नाही |
| ३३ | दुय्यम निबंधक/प्रादेशिक परिवहन/उप प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालये | होय | होय | नाही. |

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**